**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०४ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आजचा भारत कौशल्य विकासाला प्राधान्य देत असून युवावर्गाचे सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **राज्यातील सर्व संवर्गातील सेवा प्रवेश नियमांत सुधारणा करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अनुकंपा तत्वावरील आणि लिपिक श्रेणीतील १० हजार ३०९ उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरित.**
3. **नागपूरमध्ये देशाच्या एव्हिएशन क्षेत्राच केंद्र बनण्याची क्षमता - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा विश्वास.**
4. **नागपूर महापालिका निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचनेस मान्यता.**

---

**पंतप्रधान**

आजचा भारत कौशल्य विकासाला प्राधान्य देत असून, युवा वर्गाचं सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल असं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशभरात शिक्षण, कौशल्य आणि उद्योजकतेला चालना देण्याऱ्या, ६२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त, खर्चाच्या विविध युवक केंद्रित, उपक्रमांचं अनावरण केलं, त्यावेळी ते बोलत होते. नवी दिल्लीत, विज्ञान भवन इथं आयोजित कौशल्य दीक्षांत समारंभाला संबोधित करताना, पंतप्रधान म्हणाले...

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

***60 हजार करोड़ रुपये की पीएम सेतु स्कीम से हमारी आईटीआई अब इंडस्ट्रीज के साथ सीधा और मजबूती से जुड़े देशभर में नवोदय विद्यालयों और एकलव्य मॉडल स्कूलों में 1200 स्टील लैब्स का भी आज उद्घाटन किया गया है। बिहार के युवाओं के लिए भी इस मंच से अनेक योजनाओं और परियोजनाएं समर्पित हुई हैं।***

कौशल्य वाढल्यावर, देश आत्मनिर्भर होतो, निर्यात वाढल्यास रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होते त्यामुळे, कौशल्यवृद्धी साठीच्या, पी.एम.सेतू योजनेमुळे, भारताचा युवावर्गाला जगाच्या कौशल्य मागणीशी जोडला जाईल असं ते म्हणाले. देशातल्या आय.टी.आय. अर्थात, औद्योगिक प्रशिक्षण संस्था केवळ प्रशिक्षणापुरत्या

मर्यादित नसून, त्या आत्मनिर्भर भारताच्या, कार्यशाळा आहेत. देशात उत्पादकता, रोजगार, संरक्षण क्षेत्रातली उत्पादकता वाढली आहे. एम.एस.एम.ई.मध्ये रोजगार वृद्धी होत आहे याचा लाभ, भारताच्या युवाशक्तीला होत आहे, असं ते म्हणाले.

---

**वस्तू आणि सेवा कर**

देशातील मालवाहतूक क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून जीएसटी रचनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत-

***(वॉइस बाईट -हेमांगी)***

***वस्तू आणि सेवा कर रचनेतल्या सुधारणा, २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. यानुसार ट्रक, डिलिव्हरी व्हॅन यासारख्या मालवाहतूक करणाऱ्या व्यावसायिक वाहनांवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे. लघु आणि मध्यम मालवाहतूकदारांना सुलभपणे मालवाहतूक करता यावी या उद्देशानं केलेल्या या कर कपातीमुळे देशातल्या दळणवळण क्षेत्राचं पुनरुज्जीवन होऊ शकेल. जीएसटी कमी झाल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या प्रति टन वाहतुकीचा दर कमी होऊन पुरवठा साखळीवर अनुकूल परिणाम होईल, तसंच निर्यातीतली स्पर्धा वाढेल.***

---

**सर्दी-खोकल्याची औषधं**

दोन वर्षांहून कमी वयाच्या, बालकांना सर्दी खोकल्याची औषधं दिली जाऊ नयेत अशी सूचना, केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिली आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये कथित कफ सिरपच्या सेवनानं, काही मुलांचे मृत्यू झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारनं हा सल्ला दिला आहे. पाच वर्षांहून कमी वयाच्या मुलांना साधारणपणे ही औषधे दिली जात नाहीत आणि पाच वर्षांपेक्षा मोठ्या वयाच्या मुलांसाठी या औषधांचा वापर सावधगिरीनं आणि डॉक्टरांच्या देखरेखी खाली करणं आवश्यक आहे असं, मंत्रालयानं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटलं आहे. सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांच्या आरोग्य सेवा संचालकांना पत्र लिहून या सूचना केल्या आहेत.

---

**अनुकंपा तत्त्व**

राज्य शासनातील विविध संवर्गातील पदांच्या जबाबदाऱ्यांमध्ये, झालेल्या बदलांचा विचार करून, सेवा प्रवेश नियमांमध्ये सुधारणा करण्यात येणार असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं. तसंच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची, पद भरती प्रक्रिया, अधिक गतीशील करून, २०२६ मध्ये मोठ्या प्रमाणात पदभरती होणार

असल्याची घोषणाही, त्यांनी केली. मुंबईत आयोजित राज्य रोजगार मेळाव्यात अनुकंपा तत्वावरील आणि लिपिक श्रेणीतील, १०,३०९ उमेदवारांना, नियुक्तीपत्र देण्यात आलं. यावेळी, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपस्थित होते. राज्य शासन अधिक सक्षम, गतिशील आणि लोकाभिमुख करण्यासाठी, सेवा नियमांमध्ये सुधारणा, अनुकंपा प्रकरणांचे तत्काळ निराकरण, आणि पारदर्शक भरती प्रक्रिया राबविण्यावर, भर असल्याचं, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)***

***अनुकंपाच्या संदर्भात 40 वेगवेगळे जीआर होते आणि ह्या 40 शासन निर्णयामध्ये अनेक निर्णयात इतका विरोधाभास होता. या सगळ्या निर्णयांचा एकत्रितपणे विचार केला तर कदाचित कोण अनुकंपामध्ये ज्यांना नोकरी द्यायचे त्याच्या 25 टक्के लोकांनाही आपण नोकरी देऊ शकणार नाही अशा प्रकारची अवस्था होती आणि म्हणून या संपूर्ण जीआर मध्ये परिवर्तन करून या सगळ्या शासन निर्णयाचा एक सुटसुटीत सोपा शासन निर्णय यातल्या ज्या काही अडवणूक करणारा गोष्टी असतील अशा सगळ्या गोष्टी सोप्या करून टाकल्या कुठेही अडवणूक नाही.***

त्यांनी नव्यानं नियुक्त उमेदवारांना, लोकाभिमुख आणि प्रामाणिकपणे कार्य करण्याचं आवाहनही केलं. नागपुरातील जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात, अनुकंपा तत्वावर, गट-क च्या, १२७ उमेदवारांना, गट-ड १५६, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेले, ३०३, महापालिकेत सरळ सेवेतून १५६ आणि लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार, महापालिकेतील १९९ अशा, एकूण ९४१ उमेदवारांना, पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते आज, शासकीय नोकरीची नियुक्ती पत्रे, ऑनलाइन पद्धतीने प्रदान करण्यात आली. उपस्थितांच्या हस्ते २१ उमेदवारांना प्रातिनिधिक स्वरूपात पत्रे प्रदान करण्यात आली.

---------------------------------------------

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

नागपूर हे देशाच्या मध्यवर्ती स्थानी असून, नागपूरला देशाच्या एव्हिएशन क्षेत्राच, केंद्र बनण्याची क्षमता आहे. हवाई वाहतूक क्षेत्रामध्ये, सुरक्षितते सोबत, कुठलीही तडजोड न करता, या क्षेत्रात जबाबदारीनं काम करून, या क्षेत्राला आत्मनिर्भर करण्यासाठी, प्रयत्न करा असं आवाहन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी, आज नागपूर मध्ये केले. 'विकसित भारतामध्ये उड्डयन क्षेत्राची भूमिका' या विषयावर आयोजित परिसंवादाला संबोधित करताना ते बोलत होते.

***(होल्ड बाईट - नितीन गडकरी)***

***और आने वाले समय में सुरक्षा के साथ कॉप्रमाइज़ न करते हुए हम सबको आगे जाना है और ये सेक्टर जब विकसित होगा तो नागपुर का इसमें विशेष रूप से योगदान इसलिए रहेगा कि नागपुर ही देश का जीरोमाइल है दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, नागपुर से एक भी डिस्टेंस पर है और इसके कारण यहाँ से सेंटर करके पूरे देश का कंट्रोलिंग हो सकता है इसमें भी काफी संभावना है।***

एअर ट्रॅफिक, कंट्रोलर गिल्ड ऑफ इंडियाच्या वतीनं, 4 ते 6 ऑक्टोबर दरम्यान आयोजित, या परिषदेमध्ये, केंद्रीय उड्डयन मंत्रालय, एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया, त्याच प्रमाणे, विविध खाजगी कंपन्याचे, विमान वाहतूक क्षेत्रातील भागधारक उपस्थित आहे. यावेळी भारतीय विमान उड्डयन क्षेत्राच्या, प्रगती बद्दल बोलताना गडकरी यांनी सांगितलं की, गेल्या दहा वर्षात, देशातील विमानतळांची संख्या, ७५ वरून १५० झाली असून, हवाई उड्डयन क्षेत्रात, असंख्य क्षमता आहे. देहरादून ते दिल्ली या, स्पाईस जेट्स विमान प्रवासात, बायो एविएशन फ्युएलचा वापर, करण्यात आला. देशाचे शेतकरी आता, परळी, राइस हस्क यापासून, बायो एविएशन इंधन, तयार करू शकतात अशी माहिती, गडकरींनी दिली.

---------------------------------------------

**पीक पॅटर्न'-गडकरी**

शेतकऱ्यांनी 'पीक पॅटर्न' मध्ये बदल करून, बाजार पेठेच्या मागणी आणि उत्पादकता यामधील, सुवर्णमध्य साधत, उत्पन्नवाढ साधावी. साखर कारखाने पूर्ण क्षमतेने चालावेत यासाठी, नागपूर, भंडारा आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून, ऊस लागवडीस प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. मानस ॲग्रो इंडस्ट्रीज, अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या वतीनं, बेला इथं आयोजित, शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते.

---------------------------------------------

**ओबीसी संघटना**

राज्य सरकारनं बोलावलेल्या ओ.बी.सी.संघटनांची बैठक, आज, मुंबईमध्ये पार पडली. या बैठकीत, सकल ओ.बी.सी. संघटनांच्या प्रतिनिधींनी, आपली भूमिका स्पष्टपणे मांडत, दोन प्रमुख मागण्या, सरकार समोर ठेवल्या. संघटनांनी दोन सप्टेंबर रोजी, राज्य सरकारनं जारी केलेला, शासन निर्णय, ओ.बी.सी. समाजाच्या हिताला धक्का देणारा असल्याचं सांगत, तो तत्काळ रद्द करण्याची मागणी केली. तसंच २०१४ पासून, राज्यात दिल्या गेलेल्या, जात प्रमाणपत्रे आणि जात पडताळणी प्रमाण पत्रांबाबत, सरकारनं, श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी अशी ही संघटनांची मागणी होती.

-----------------------------------------------

**प्रभाग रचना**

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठीची अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाने मंजूर केली आहे. या रचनेत प्रभाग क्र. ७ आणि ९ मधील हद्द मुख्य रस्त्याने घेण्याचा तसेच प्रभाग क्र. २८ ची दक्षिणेकडील हद्द सुधारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बदलांमुळे लोकसंख्येच्या संतुलनात कोणताही फरक होणार नाही.सुधारित प्रभाग रचना नगर विकास विभागाने ठरविलेल्या वेळापत्रकानुसार प्रसिद्ध करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगातर्फे देण्यात आले आहेत.

-----------------------------------------------

**मादी बिबट्या**

अमरावती शहरातील कॅम्प परिसरातील थॉमस चर्चजवळ मादी बिबट्या, आपल्या पिल्लासह फिरताना दिसल्यानं, परिसरात चिंता निर्माण झाली आहे. वन विभाग, पोलिस आणि प्रशासन, परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, नागरिकांना घाबरून न जाता, सतर्क राहण्याचे आणि काळजी घेण्याचे आवाहन, केले आहे.

-----------------------------------------------

**महिला विश्वचषक क्रिकेट**

महिला विश्वचषक, क्रिकेट स्पर्धेत, भारताचा सामना, पारंपरिक प्रतिस्पर्धी, पाकिस्तान बरोबर, उद्या, श्रीलंकेतल्या कोलंबो इथल्या, आर.प्रेमदासा स्टेडियमवर होणार आहे. पाकिस्तान बरोबर आतापर्यंत झालेल्या, सर्व प्रकारच्या सामन्यांमध्ये, भारतानं, २७ पैकी २४ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे.

-----------------------------------------------